भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कुटुंब न्यायालये अधिनियम, १९८४

(सन १९८४ चा अधिनियम क्रमांक ६६)

[दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान]

# The Family Courts Act, 1984

**(Act No. 66 of 1984)**

**[ As in force on the 1st December, 1999]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ५.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला फॅमिली कोर्ट अॅक्ट, १९८४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २००० यात पृष्ठ ३१ ते ३६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून, २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Family Court Act, 1984 as on the 1st December, 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 1, Volume 11, dated 22nd June, 2000 on pages 31 to 36.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 22nd June, 2000.

# कुटुंब न्यायालये अधिनियम, १९८४

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक
### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.

### प्रकरण दोन
### कुटुंब न्यायालये

३. कुटुंब न्यायालयांची स्थापना.
४. न्यायाधीशांची नियुक्ती.
५. समाजकल्याण अभिकरणे, इत्यादींचा अधिसंघ.
६. कुटुंब न्यायालयाचे समुपदेशक, अधिकारी आणि इतर कर्मचारी.

### प्रकरण तीन
### अधिकारिता

७. अधिकारिता.
८. अधिकारितेचे अपवर्जन व प्रलंबित कार्यवाही.

### प्रकरण चार
### कार्यपद्धती

९. समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे कुटुंब न्यायालयाचे कर्तव्य.
१०. सर्वसाधारणतः कार्यपद्धती.
११. कार्यवाही गुप्तरीत्या करणे.
१२. वैद्यकीय व कल्याण तज्ञांचे सहाय्य.
१३. वैध प्रतिनिधित्वाचा अधिकार.
१४. भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) लागू करणे.
१५. मौखिक पुराव्याचा अभिलेख.
१६. शपथपत्रावरील औपचारिक स्वरूपाची साक्ष.
१७. न्यायनिर्णय.
१८. हुकूमनामे व आदेश यांची अंमलबजावणी.

### प्रकरण पाच
### अपिले व पुनरीक्षणे

१९. अपील.

### प्रकरण सहा
### संकीर्ण

२०. अधिनियमाला अधिभावी परिणाम असणे.
२१. उच्च न्यायालयाची नियम करण्याची शक्ती.
२२. केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती.
२३. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

एच ४००४—२ (१०३५—१—२००४)

# कुटुंब न्यायालये अधिनियम, १९८४

## (१९८४ चा अधिनियम क्रमांक ६६)

(१ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[१४ सप्टेंबर, १९८४]

**विवाह व कौटुंबिक गोष्टी यांच्याशी संबंधित विवादांमध्ये समेट घडवून आणण्याच्या दृष्टीने आणि ते शीघ्रतेने मिटवण्याच्या दृष्टीने कुटुंब न्यायालये स्थापन करण्यासाठी आणि तत्संबंधित इतर बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या पस्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास कुटुंब न्यायालये अधिनियम, १९८४ असे म्हणावे.

(२) याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्ये खेरीजकरून, संपूर्ण भारतभर आहे.

(३) शासन, अधिसूचनेद्वारे **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील अशा दिनांकास* तो अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "न्यायाधीश" याचा अर्थ, कुटुंब न्यायालयाचा न्यायाधीश, किंवा, यथास्थिति, मुख्य न्यायाधीश, अपर मुख्य न्यायाधीश किंवा इतर न्यायाधीश, असा आहे;

(ख) "अधिसूचना" याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेली अधिसूचना, असा आहे;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(घ) "कुटुंब न्यायालय" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले कुटुंब न्यायालय, असा आहे;

(ङ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५ ) यामध्ये व्याख्या केलेले इतर सर्व शब्द व वाक्प्रयोग यांना, त्या संहितेमध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

### प्रकरण दोन

### कुटुंब न्यायालये

कुटुंब न्यायालयांची स्थापना.

३. (१) या अधिनियमाद्वारे कुटुंब न्यायालयाला प्रदान करण्यात आलेली अधिकारिता आणि शक्ती यांचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर आणि अधिसूचनेद्वारे,—

(क) अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, जेथील लोकसंख्या दहा लाखाहून अधिक असेल असे कोणतेही शहर किंवा नगर समाविष्ट असलेल्या राज्यातील प्रत्येक क्षेत्रासाठी कुटुंब न्यायालय स्थापन करील;

---

*१. राजस्थान— भारताचे राजपत्र, भाग-दोन, खंड-एक मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक ७९/१७/८५, दिनांक १८ नोव्हेंबर, १९८५ द्वारे दिनांक १९ नोव्हेंबर, १९८५ रोजी अंमलात आला.

*२. उत्तर प्रदेश— भारताचे राजपत्र, भाग-दोन, खंड एक मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक ७९/११/८६, दिनांक ४ सप्टेंबर, १९८६ द्वारे दिनांक २ ऑक्टोबर, १९८६ रोजी अंमलात आला.

*३. तामिळनाडू— भारताचे राजपत्र, भाग-दोन, खंड-एक मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक ७९/८/८६, दिनांक १८ सप्टेंबर, १९८६ द्वारे दिनांक २ ऑक्टोबर, १९८६ रोजी अंमलात आला.

*४. दिल्ली संघराज्य क्षेत्र—भारताचे राजपत्र, असाधारण, भाग-दोन, खंड-३ (दोन) मध्ये प्रसिद्ध झालेला स्था. आ. क्र. ८६३ (ई), दिनांक १८ नोव्हेंबर, १९८६ द्वारे दिनांक १९ नोव्हेंबर, १९८६ रोजी अंमलात आला.

*५. महाराष्ट्र— भारताचे राजपत्र, असाधारण, भाग-दोन, खंड-३ (दोन) मध्ये प्रसिद्ध झालेला स्था. आ. क्र. ९४४(ई), दिनांक ५ डिसेंबर, १९८६ द्वारे दिनांक १ डिसेंबर, १९८६ रोजी अंमलात आला.

(ख) त्याला आवश्यक वाटतील अशा राज्याच्या इतर क्षेत्रांसाठी कुटुंब न्यायालये स्थापन करू शकेल.

(२) राज्य शासन, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, कुटुंब न्यायालयाची अधिकारिता जेथपर्यंत विस्तारित असेल त्या क्षेत्राच्या स्थानिक सीमा अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील आणि ते कोणत्याही वेळी अशा सीमांमध्ये वाढ करू शकेल, त्या कमी करू शकेल किंवा त्यात बदल करू शकेल.

न्यायाधीशांची नियुक्ती. ४. (१) राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या सहमतीने, कुटुंब न्यायालयाचा/चे न्यायाधीश म्हणून एका किंवा अधिक व्यक्तींची नियुक्ती करू शकेल.

(२) कुटुंब न्यायालयात एकापेक्षा अधिक न्यायाधीश असतील तेव्हा,—

(क) न्यायाधीशांपकी प्रत्येक न्यायाधीश, या अधिनियमांद्वारे वा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे न्यायालयाला प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही शक्तींचा वापर करू शकेल;

(ख) राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या सहमतीने, न्यायाधीशांपैकी कोणत्याही न्यायाधीशाची मुख्य न्यायाधीश म्हणून आणि अन्य कोणत्याही न्यायाधीशाची अपर मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करू शकेल;

(ग) मुख्य न्यायाधीश, वेळोवेळी, न्यायालयाच्या कामकाजाचे त्याला योग्य वाटेल अशारीतीने त्याच्या निरनिराळ्या न्यायाधीशांमध्ये वाटप करण्याची व्यवस्था करू शकेल;

(घ) मुख्य न्यायाधीशाच्या पदाच्या कोणत्याही रिक्ततेच्या प्रसंगी किंवा अनुपस्थिती, आजारपण वा अन्य कोणतेही कारण यांमुळे मुख्य न्यायाधीश आपले कर्तव्य पार पाडू शकत नसेल त्यावेळी अपर मुख्य न्यायाधीश मुख्य न्यायाधीशाच्या शक्तींचा वापर करू शकेल.

(३) एखाद्या व्यक्तीने,—

(क) किमान सात वर्षे भारतात एखादे न्यायिक पद किंवा अधिकरणाच्या सदस्याचे पद किंवा कायद्याचे विशेष ज्ञान आवश्यक असणारे कोणतेही संघराज्यातील वा राज्यातील पद धारण केले असल्याखेरीज, किंवा

(ख) ती व्यक्ती लागोपाठ किमान सात वर्षे उच्च न्यायालयाचा किंवा अशा दोन वा अधिक न्यायालयांचा अधिवक्ता असल्याखेरीज, किंवा;

(ग) भारताच्या मुख्य न्यायाधीशाच्या सहमतीने, केंद्र सरकार विहित करील अशा अन्य अर्हता धारण करीत असल्याखेरीज,

न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह असणार नाही.

(४) न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यासाठी व्यक्तींची निवड करताना,—

(क) विवाह संस्थेच्या संरक्षणाच्या व ती जतन करण्याच्या गरजेपोटी आणि बालकांच्या कल्याणकार्यासाठी ज्यांनी स्वतःस बांधून घेतले आहे आणि ज्यांच्या अनुभवामुळे व तज्ञतेमुळे समेट व समुपदेश यांद्वारे विवाद मिटवण्याच्या दृष्टीने ज्या अर्ह आहेत अशा व्यक्ती निवडल्या जातील, हे सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्नाची शिकस्त केली जाईल, आणि

(ख) महिलांना प्राधान्य दिले जाईल.

(५) वयाची बासष्ट वर्षे पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीची कुटुंब न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली जाणार नाही किंवा ती त्या न्यायाधीशांचे पद धारण करणार नाही.

(६) न्यायाधीशाला देय असलेले वेतन वा मानधन आणि इतर भत्ते तसेच त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती राज्य शासन, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर विहित करील त्याप्रमाणे असतील.

समाजकल्याण अभिकरणे, इत्यादींचा व अधिसंघ. ५. राज्य शासन, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, नियमांद्वारे, नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्रयोजनांसाठी आणि अशा शर्तींच्या अधीनतेने खालील घटक व कुटुंब न्यायालयांच्या अधिसंघासाठी उपबंध करू शकेल :—

(क) समाजकल्याणकार्यात गुंतलेल्या संस्था वा संघटना किंवा त्याचे प्रतिनिधी,

(ख) कुटुंब कल्याण प्रवर्धित करण्यात व्यावसायिकरीत्या गुंतलेल्या व्यक्ती,

(ग) समाजकल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती,

(घ) कुटुंब न्यायालयाशी निगडीत असल्यामुळे या अधिनियमाच्या प्रयोजनांनुसार आपल्या अधिकारितेचा अधिक परिणामकारक रीतीने वापर करणे जिला शक्य होईल अशी कोणतीही व्यक्ती.

६. (१) राज्य शासन, उच्च न्यायालयाशी विचार विनिमय केल्यानंतर, कुटुंब न्यायालयाला आपली कर्तव्ये पार पाडीत असताना सहाय्य करण्यास आवश्यक असणारे समुपदेशक, अधिकारी व इतर कर्मचारी यांची संख्या व संवर्ग निर्धारित करू शकेल आणि त्याला योग्य वाटतील असे समुपदेशक, अधिकारी व इतर कर्मचारी कुटुंब न्यायालयाला पुरवू शकेल.

कुटुंब न्यायालयाचे समुपदेशक, अधिकारी आणि इतर कर्मचारी.

(२) समुपदेशकांनी कितपत संबंधित असावे यासंबंधातील अटी व शर्ती आणि पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती राज्य शासनाकडून करण्यात येतील अशा नियमांद्वारे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

### अधिकारिता

७. (१) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, कुटुंब न्यायालयाला,—

अधिकारिता.

(क) स्पष्टीकरणात उल्लेखिलेल्या स्वरूपाचे दावे व कार्यवाही यांच्या संबंधात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही जिल्हा न्यायालयाकडून वा कोणत्याही दुय्यम दिवाणी न्यायालयाकडून वापरता येण्याजोगी सर्व अधिकारिता असेल व ते तिचा वापर करू शकेल ; आणि

(ख) अशा कायद्याखालील अशी अधिकारिता वापरण्याच्या प्रयोजनांसाठी ते, कुटुंब न्यायालयाच्या अधिकारितेचा विस्तार होत असेल त्या क्षेत्रासाठी जिल्हा न्यायालय, किंवा यथास्थिति, असे दुय्यम दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात उल्लेखिलेले दावे व कार्यवाही म्हणजे खालील स्वरूपाचे दावे व कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल :—

(क) विवाहाच्या विलोपनाच्या हुकूमनाम्यासाठी (विवाहशून्य आणि रद्दबातल ठरविणारा, किंवा यथास्थिती, विवाहाचे विलोपन करणारा) अथवा दांपत्य अधिकारांचे प्रत्यास्थापन वा न्यायिक फारकत वा विवाह विच्छेद यांच्या हुकूमनाम्यासाठी विवाहातील पक्षांमधील दावा वा कार्यवाही ;

(ख) कोणत्याही व्यक्तीच्या विवाहाची विधिग्राह्यता किंवा तिची वैवाहिक स्थिती यासंबंधातील घोषणेसाठी दावा वा कार्यवाही ;

(ग) विवाहातील पक्षांमधील, त्या पक्षांच्या किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकाच्या संपत्तीच्या संबंधातील दावा किंवा कार्यवाही ;

(घ) वैवाहिक नात्यातून उद्‌भवणाऱ्या परिस्थितीतील आदेशासाठी वा व्यादेशासाठी दावा वा कार्यवाही ;

(ङ) कोणत्याही व्यक्तीच्या औरसतेच्या घोषणेसाठी दावा वा कार्यवाही ;

(च) निर्वाहासाठी दावा वा कार्यवाही ;

(छ) व्यक्तीचे पालकत्व किंवा कोणत्याही अज्ञान व्यक्तीची अभिरक्षा किंवा तिच्यापर्यंत पोचणे यासंबंधातील दावा वा कार्यवाही.

(२) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने कुटुंब न्यायालयाला खालील अधिकारिताही असेल आणि ते तिचा वापर करील—

(क) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या प्रकरण नऊ खालील (पत्नी, मुले व मातापिता यांच्या निर्वाहासाठीच्या आदेशासंबंधातील) प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला वापरता येण्याजोगी अधिकारिता ;

(ख) अन्य कोणत्याही अधिनियमितीद्वारे त्याला प्रदान करता येईल अशी अन्य कोणतीही अधिकारिता.

८. कोणत्याही क्षेत्रासाठी कुटुंब न्यायालय स्थापन झाले असेल तेव्हा,—

अधिकारितेचे अपवर्जन व प्रलंबित कार्यवाही.

(क) कोणत्याही जिल्हा न्यायालयाला वा कलम ७ च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही दुय्यम दिवाणी न्यायालयाला अशा क्षेत्राच्या बाबतीत त्या पोट कलमाच्या स्पष्टीकरणात उल्लेखिलेल्या स्वरूपाच्या कोणत्याही दाव्यासंबंधात वा कार्यवाहीसंबंधात कोणतीही अधिकारिता असणार नाही किंवा ते तिचा वापर करणार नाही;

(ख) कोणत्याही दंडाधिकाऱ्याला, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या प्रकरण नऊ खालील कोणतीही अधिकारिता किंवा शक्ती असणार नाही किंवा तो तिचा वापर करणार नाही ;

(ग्) कलम ७, पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणात निर्देशिलेल्या स्वरूपाचा प्रत्येक दावा किंवा कार्यवाही आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या प्रकरण नऊ खालील प्रत्येक कार्यवाही—

(एक) जी अशा कुटुंब न्यायालयाच्या स्थापनेच्या निकटपूर्वी त्या पोट कलमामध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही जिल्हा न्यायालयाच्यासमोर किंवा दुय्यम न्यायालयासमोर किंवा यथास्थिति, उक्त संहितेखालील कोणत्याही दंडाधिकाऱ्यासमोर प्रलंबित असेल; आणि

(दोन) असा दावा वा कार्यवाही ज्या दिनांकास दाखल करण्यात वा करण्यात आली असेल त्यापूर्वीच ती, हा अधिनियम अंमलात आला असता आणि असे कुटुंब न्यायालय स्थापन झाले असते तर अशा कुटुंब न्यायालयाकडून दाखल करणे वा करणे आवश्यक असेल तेव्हा,

असे कुटुंब न्यायालय ज्या दिनांकास स्थापन झाले असेल त्या दिवशी त्याच्याकडे हस्तांतरित झालेली असेल.

## प्रकरण चार

### कार्यपद्धती

*समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे कुटुंब न्यायालयाचे कर्तव्य.*

९. (१) प्रत्येक दाव्यात किंवा कार्यवाहीत, प्रकरणाचे स्वरूप व परिस्थिती यानुसार सुसंगतपणे तसे करणे शक्य असेल तेथवर, कुटुंब न्यायालयाकडून, दावा वा कार्यवाहीच्या विषयवस्तूसंबंधात समेट घडवून आणण्यासाठी पक्षकारांना सहाय्य करण्याचा व त्यांचे मन वळविण्याचा सर्वप्रथम प्रयत्न केली जाईल आणि या प्रयोजनासाठी कुटुंब न्यायालयाला उच्च न्यायालयाकडून करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, त्याला योग्य वाटेल अशी कार्यपद्धती अनुसरता येईल.

(२) कोणताही दावा वा कार्यवाही यामध्ये, कोणत्याही टप्प्याला, पक्षकारांमध्ये समेट होण्याची वाजवी शक्यता आहे असे कुटुंब न्यायालयाला वाटले तर, असा समेट घडून यावा यादृष्टीने प्रयत्न करणे शक्य व्हावे यासाठी त्याला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी कुटुंब न्यायालयाला कार्यवाही स्थगित करता येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेली शक्ती ही, कुटुंब न्यायालयाच्या कार्यवाही स्थगित करण्याच्या अन्य कोणत्याही शक्तीतील भर असेल, तिला न्यूनकारी असणार नाही.

*सर्व-साधारणत: कार्यपद्धती.*

१०. (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या आणि नियमांच्या अधीनतेने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) आणि त्या त्या काळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा याचे उपबंध, कुटुंब न्यायालयापुढील दावे व कार्यवाही (फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या प्रकरण नऊ खालील कार्यवाही व्यतिरिक्त) यांना लागू होतील आणि संहितेच्या उक्त उपबंधांच्या प्रयोजनासाठी, कुटुंब न्यायालय हे दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि त्याला त्या न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील.

(२) या अधिनियमाचे इतर उपबंध आणि नियम यांना अधीन राहून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांचे उपबंध कोणत्याही कुटुंब न्यायालयासमोरील त्या संहितेच्या प्रकरण नऊ खालील कार्यवाहीला लागू होतील.

(३) दावा वा कार्यवाही यातील विषयवस्तूसंबंधात समझोता घडवून आणण्याच्या दृष्टीने किंवा एका पक्षकाराने अभिकथित केलेले आणि दुसऱ्याने नाकारलेले तथ्य याबद्दलचे सत्य शोधून काढण्याच्या दृष्टीने आपली स्वत:ची कार्यपद्धती आखण्यास कुटुंब न्यायालयाला पोटकलम (१) वा पोटकलम (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

*कार्यवाही गुप्तरीत्या करणे.*

११. हा अधिनियम ज्यास लागू होतो असा प्रत्येक दावा वा कार्यवाही यामध्ये कुटुंब न्यायालयाची तशी इच्छा असल्यास कार्यवाही गुप्तरीतीने करता येईल आणि कोणत्याही पक्षकाराची तशी इच्छा असल्यास ती तशी करता येईल.

*वैद्यकीय व कल्याण तज्ञांचे सहाय्य.*

१२. प्रत्येक दावा किंवा कार्यवाही यामध्ये, या अधिनियमाद्वारे लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडताना, कुटुंब न्यायालयाला सहाय्य करण्यासाठी न्यायालयाला योग्य वाटेल असा वैद्यकीय तज्ञ किंवा अशी व्यक्ती (उपलब्ध असेल तेथे शक्यतोवर महिला) मग ती पक्षकारांशी संबंधित असो वा नसो—यात कुटुंब कल्याणाच्या कामी व्यावसायिकरीत्या गुंतलेल्या व्यक्तीचाही समावेश आहे—यांच्या सेवा मिळविण्याची कुटुंब न्यायालयाला मुभा असेल.

*वैध प्रति-निधित्वाचा अधिकार.*

१३. कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुटुंब न्यायालयापुढील दावा वा कार्यवाही यामधील कोणत्याही पक्षकाराला हक्कदार म्हणून, विधि-व्यवसायीद्वारे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार असणार नाही :

परंतु, कुटुंब न्यायालयाला न्यायाच्या हिताच्या दृष्टीने तसे आवश्यक वाटल्यास त्याला विधितज्ञाचे न्यायमित्र म्हणून सहाय्य घेता येईल.

१४. कुटुंब न्यायालयाला त्याच्या मते तंटा परिणामकारकरीत्या हाताळण्यासाठी त्याला सहाय्य होईल असा कोणताही अहवाल, निवेदन, दस्तऐवज, माहिती किंवा मजकूर पुरावा म्हणून स्वीकारता येईल-मग तो भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) अन्वये अन्यथा संबद्ध वा ग्राह्य असो वा नसो. भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) लागू करणे.

१५. कुटुंब न्यायालयापुढील दावे वा कार्यवाही यांमध्ये, साक्षीदारांचा पुरावा विस्तृतपणे नोंदविण्याची आवश्यकता नाही, परंतु न्यायाधीश, प्रत्येक साक्षीदाराची तपासणी चालू असेल तेव्हा, साक्षीदार जी जबानी देत असेल त्या विषयाचे सारज्ञापन नोंदवील किंवा नोंदवून घेईल आणि अशा सारज्ञापनावर साक्षीदार व न्यायाधीश सही करतील आणि तो अभिलेखाचा एक भाग असेल. मौखिक पुराव्याचा अभिलेख.

१६. (१) कोणत्याही व्यक्तीची साक्ष, ती औपचारिक स्वरुपाची असेल तेव्हा, शपथपत्राद्वारे दिली जाईल आणि सर्व न्याय्य अपवादांच्या अधीनतेने कुटुंब न्यायालयापुढील कोणताही दावा वा कार्यवाही यामध्ये पुराव्यात ती वाचता येईल. शपथपत्रावरील औपचारिक स्वरूपाची साक्ष.

(२) कुटुंब न्यायालय, त्याला योग्य वाटल्यास आणि दावा वा कार्यवाही यातील कोणत्याही पक्षकारांच्या अर्जानुसार, अशा कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवील व तिच्या शपथपत्रातील तथ्यांसंबंधात तिची तपासणी करील.

१७. कुटुंब न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये प्रकरणाचे संक्षिप्त कथन, निर्धारित करावयाचा मुद्दा, त्यावरील निर्णय आणि अशा निर्णयाची कारणे समाविष्ट असतील. न्यायनिर्णय.

१८. (१) कुटुंब न्यायालयाकडून काढण्यात आलेल्या हुकूमनाम्याचा वा आदेशाचा (फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या प्रकरण नऊ खालील आदेशाव्यतिरिक्त) दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा वा आदेश यासारखाच अंमल असेल व तो सारखाच परिणामक असेल आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) द्वारे हुकूमनामे व आदेश यांच्या अंमलबजावणीसाठी विहित करण्यात आलेल्या रीतीनेच त्याचीही अंमलबजावणी केली जाईल. हुकूमनामे व आदेश यांची अंमलबजावणी.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या प्रकरण नऊ अन्वये काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी, त्या संहितेअन्वये अंमलबजावणीसाठी विहित केलेल्या रीतीनेच केली जाईल.

(३) हुकूमनामा वा आदेश याची अंमलबजावणी एकतर, ज्या कुटुंब न्यायालयाकडून तो काढण्यात आला असेल त्याच्याकडून किंवा ज्याच्याकडे तो अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आला असेल त्या कुटुंब न्यायालयाकडून वा सर्वसाधारण दिवाणी न्यायालयाकडून केली जाईल.

## प्रकरण पाच

### [1][अपिले व पुनरीक्षणे]

१९. (१) पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले असेल त्याखेरीज आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) किंवा अन्य कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कुटुंब न्यायालयाच्या अंतरवादिक आदेश नसलेल्या प्रत्येक न्यायनिर्णयावर वा आदेशावर, उच्च न्यायालयाकडे, तथ्ये व कायदा यासंबंधात अपील करता येईल. अपील.

(२) पक्षकारांच्या संमतीने [2][किंवा भारतीय दंड प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण ११ अन्वये दिलेल्या आदेशावरून] कुटुंब न्यायालयाकडून काढण्यात आलेल्या हुकूमनाम्यावर वा आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.

(३) या कलमाखालील प्रत्येक अपील, कुटुंब न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या वा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत दाखल करण्यात येईल.

(४) पूर्वोक्ताव्यतिरिक्त एरव्ही कुटुंब न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, आदेश वा हुकूमनामा यावर कोणत्याही न्यायालयात कोणतेही अपील वा पुनरीक्षण करण्यात येणार नाही.

(५) पोटकलम (१) अन्वये दाखल केलेल्या कोणत्याही अपिलाची दोन किंवा अधिक न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे सुनावणी करण्यात येईल.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

२०. या अधिनियमाचे उपबंध, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अथवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक असलेल्या संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत काहीही अंतर्भूत असले तरी परिणामक असतील. अधिनियमाला अधिभावी परिणाम असणे.

---

१. १९९१ चा अधिनियम, ४१ कलम २(क्) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २(ख्) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट केला.

उच्च न्यायालयाची नियम करण्याची शक्ती.

२१. (१) उच्च न्यायालयाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्ववर्ती शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या म्हणजे :—

(क) कुटुंब न्यायालयाचे नेहमीचे कामाचे तास आणि सुट्टयांच्या दिवशी व कामाच्या नेहमीच्या वेळेनंतर बैठकी घेणे;

(ख) कुटुंब न्यायालयांच्या बैठकींच्या सामान्य ठिकाणांव्यतिरिक्त अन्यत्र त्यांच्या बैठकी घेणे ;

(ग) समझोता करून घेण्यासाठी येणाऱ्या पक्षकारांना सहाय्य करण्याच्या आणि त्यांचे मन वळविण्याबाबत कुटुंब न्यायालयाकडून केले जाणारे प्रयत्न आणि अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती.

केंद्र सरकारची नियम करण्याची शक्ती.

२२. (१) केंद्र सरकारला, भारताच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने, अधिसूचनेद्वारे, कलम ४ पोटकलम (३) च्या खंड (ग) मध्ये निर्देशिलेल्या न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी इतर अर्हता विहित करणारे नियम करता येतील.

(२) केंद्र सरकारने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा यथास्थिती, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

२३. (१) राज्य शासन उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पोटकलम (१) च्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांत खालील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी उपबंध करता येतील, ते असे :—

(क) कलम ४ च्या पोटकलम (६) अन्वये, न्यायाधीशांना देय असलेले वेतन किंवा मानधन व इतर भत्ते आणि इतर अटी व शर्ती;

(ख) कलम ६ मध्ये निर्देशिलेल्या समुपदेशकांच्या अधिसंघाच्या अटी व शर्ती आणि अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ग) कलम १२ मध्ये निर्देशिलेले वैद्यकीय व इतर तज्ञ आणि इतर व्यक्ती यांची फी व इतर खर्च (प्रवासखर्च धरून) राज्याच्या महसुलातून देणे आणि अशी फी व खर्च यांचे प्रमाण;

(घ) कलम १३ अन्वये न्यायमित्र म्हणून नियुक्त केलेल्या विधिव्यवसायींची फी व इतर खर्च राज्य शासनाच्या महसुलातून देणे आणि अशी फी व खर्च यांचे प्रमाण ;

(ङ) नियमांद्वारे विहित किंवा उपबंधित करणे आवश्यक असलेली वा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधान मंडळापुढे ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई